MASTERLINE EXPRESS

मास्टरलाईनच्या शिरपेचात 'मानाचा तुरा'

संचालकांच्या उपस्थितीत "आनंदोत्सव" साजरा



"मास्टरलाईन लुब्रीकंट" प्रायवेट लिमिटेडच्या इतिहासात १३ जून रोजी गुरूपौर्णिमेच्या शुभ दिवशी एक चांगली नोंद झाली आहे. मास्टरलाईन इंजिन ऑईलची आता विदेशवारी सुरू झाली आहे. त्यामुळे कंपनीच्या यशात आणखी एक "मानाचा तूरा" रोवला गेला आहे. गत अडीच वर्षांच्या परिश्रमानंतर हे यश मिळाल्याने कंपनीचे संचालक श्री. सुयोगभाऊ जैन व ईशिका जैन यांच्या मुख्य उपस्थितीत तसेच सर्व कर्मचारी वर्गाच्या हजेरीत आज १४ जून रोजी कंपनीत पेढे वाटून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.







मास्टरलाईनचे इंजिन ऑईलचे महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटकसह देशभरातील इतर राज्यांतही जाळे मजबूत होत असतांना १३ जून रोजी गुरूपौर्णिमेच्या शुभदिनी जगातील श्रीमंत देशांच्या यादीत क्रमाक १ वर असलेल्या खाडी राष्ट्रात (अखाती राष्ट) मास्टरलाईन चा प्रवास सुरु झाला आहे. या अखाती देशातून कंपनीला ऑईलची ऑर्डर मिळाली आहे यामुळे मास्टरलाईन आपले उत्पादन बाहेर देशात एक्स्पोर्ट करण्याची संधी मिळाली आहे . सरळ शब्दात सांगायचे झाल्यास मास्टरलाईनच्या ब्रॅन्डने (प्रॉडक्ट) विदेशात धडक दिली आहे आणि विशेष म्हणजे विदेशात मास्टरलाईन इंजिन ऑईल या ब्रांड च्या नावाखालीच अखाती देशात एक्स्पोर्ट केले जाणार आहे . आखाती राष्ट हे जगाला क्रुड ऑईल विकतात अशा देशात मास्टरलाईन इंजिन ऑइल एक्सपोर्ट करते आहे कंपनी व देशासाठी ही बाब नक्कीच गौरवशाली आहे.



यशाचे 'श्रेय' सर्व टीमला - संचालक श्री. सुयोगभाऊ जैन

प्रत्येक कंपनी जेव्हा सुरु होते तेव्हा त्या कंपनी सुरु करणाऱ्या च्या मनात एक स्वप्न असते कि आपले उतपादन आपल्या नावाने देशा बाहेर विकले जावे . त्या साठी ती कंपनी त्यात काम करणारे कर्मचारी हे सातत्याने आपल्या प्रॉडक्ट ला उत्कृष्ट बनवण्यासाठी प्रयत्न करत असतात आणि एके दिवशी प्रयत्नांना यश मिळते तो दिवस हा अत्यंत आनंदाचा असतो. आणि आज तो दिवस मास्टरलाईन साठी आला आहे . कंपनीचा "ब्रॅन्ड" आता अखाती देशात पोहचणार असून गत अडीच वर्षांपासूनच्या प्रयत्नाला खरे यश

MASTERLINE EXPRESS

गुरूपौर्णिमेला मिळाल्याचा आनंद वाटत आहे. या यशाचे खरे मानकरी संचालक श्री. समीरभाऊ जैन व प्रॉडक्शन मॅनेजर श्री. हर्षल महाजन, प्रशाकीय मॅनेजर यांच्यासह पुर्ण टीम आहे. त्यांच्या परिश्रमानेच हे सर्व झाले. दोन वर्षांपासून कोरोनामुळे हा विषय बाजूला सारला गेला होता. किंवा त्यात खंड पडला होता. आता पुढे आणखी जबाबदारी कंपनीवर वाढली असून आपण सर्व प्रामाणिकपणाने येणारे विषय हाताळूत. मास्टरलाईन येथे थांबणार नाही आजून यापुढे जाऊन यश चे नवीन शिखर पादाक्रांत करणारा आहे असा आम्हाला विश्वास आहे. कंपनीसाठी व सर्वांसाठी ही गोष्ट अतिशय आनंददायी आहे, 'ब्रॅन्ड मोठा' झाला तर आपण मोठे होऊच असे संचालक श्री. सुयोगभाऊ जैन यांनी सांगितले.

काळजीपुर्वक काम करून "बेस्ट प्रॉडक्ट" देऊ - हर्षल महाजन



कंपनीत किंवा मोठ्या संस्थेत काम करीत असतांना यश हे एकट्याचे कधीच नसते. त्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत होतच असते. तसेच अखाती देशात मध्ये आपण पोहचण्याच्या यशामागे कंपनीतील वरिष्ठांसह इतर सर्व कर्मचारी बांधवांचेही मोठे सहकार्य मिळाल्याचे प्रॉडक्शन मॅनेजर श्री. हर्षल महाजन यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले कि, गत काही वर्षांपूर्वी या देशाची टीम कंपनीला भेट देऊन गेली होती. मध्यंतरी कोरोना पसरला होता. त्यामुळे पुढील प्रक्रीया थांबल्या होत्या. मात्र आता सगळीकडे सर्व 'अनलॉक' झाल्याने समोरील कंपनी ने आपल्या कंपनीस ऑर्डर दिली आहे. त्यामुळे आपल्या कामात कोणत्याही त्रुटी असू नयेत. दर महिन्याला ऑईलचा पुरवठा झाला पाहीजे, उत्तम दर्जाचे प्रॉडक्ट देण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. प्रामाणिकपणे काम करून आणखी इतर देशांमध्ये पोहचण्यासाठी आपण सर्वच प्रयत्नशील असूत, असे त्यांनी म्हटले.

पुन्हा एकदा भारताला 'सोने कि चीढिया' बनवूया... सुयोग जैन



भारताला एके काळी "सोने कि चीढिया" असे संबोधले जायचे याच कारण होते भारत देश त्याकाळी जगातील एकूण एक्सपोर्ट च्या ३५-४५ टक्के भरातून केला जात असे त्या काळी चलन म्हणून सोन्याचा उपयोग केला जात असे, भारतीय मालाच्या मोबदल्यात जगभरातून सोन भारतात येत होत यामुळे आपल्या भारत देशला 'सोने कि चीढिया' म्हटले जायचे. आज जर आपल्या परत देशाला समृद्ध बनवायचे असेलतर आपल्या जास्तीजास्त प्रमाणात आपल्या मालाला विदेशात विकून विदेशी धन अर्जित केले पाहिजे तेव्हाच आपण अर्थाने आपण राष्ट भक्ती करत आहोत याचा सार्थ खऱ्या आभिमान वाटेल.

कंपनी व आपल्या सर्वांसाठी खूप "मोठी संधी" : श्री. राठौर - श्री. महाजन





विदेशात आपण आता ऑईलचा पुरवठा करणार आहोत, ही बाब आपल्यासाठी खूप मोठी बाब असून इतर देशात सुध्दा या निमित्ताने पोहचण्याची 'संधी' मिळाली असल्याचे प्रशासकीय मॅनेजर श्री. मनोज महाजन यांनी सांगितले तर चॅनल सेल्सचे नॅशनल हेड श्री. रितेश सिंह राठौर यांनी सांगितले कि, अखाती देशात कंपनी आता ऑईलचा पुरवठा करणार असून आपल्या देशातही ब्रॅन्डवरील विश्वास अधिक मजबूत होण्यासाठी फायदा होईल. आता आपल्याला प्रॉडक्टबाबत रिपोर्ट देण्याची गरज भासणार नाही. आपला ब्रॅन्डच विश्वासर्हतेचा राहील, असे त्यांनी सांगितले.

यांची होती उपस्थिती - आज १४ जून रोजी झालेल्या आनंदोत्सव कार्यक्रमास श्री. कपिल शिंपी, श्री. योगेश महाजन, श्री. हर्षल पाटील, महिला कर्मचारी दर्शना सोनजे, ऋचिता पाटील, हर्षदा पाटील, जागृती मोरे, मिनाक्षी वाघ, परमेश्वर पाटील, राजेंद्र बैरागी, तेजसिंग पाटील, सुनिल कुंभार, संजय भंडारी, शरद पाटील, गोकुळ पाटील, किशोर पाटील, समाधान पाटील यांच्यासह इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, संचालक श्री. सुयोगभाऊ जैन यांनी कर्मचारी वर्गाला पेढे भरवून आनंद व्यक्त केला.











MASTERLINE EXPRESS





कंपनीच्या यशामुळे एकमेकांना पेढे भरवून आनंद साजरा करतांना संचालक सुयोगभाऊ जैन, हर्षल महाजन, रितेश सिंह राठौर, मनोज महाजन यांच्यासह कंपनीतील सर्व विभागातील कर्मचारी वर्ग.

Visit Website: http://www.masterlineworld.com

Facebook : https://www.facebook.com/MasterlineEngineOils/

Instagram : https://www.instagram.com/masterlineoil?r=nametag

YouTubechannel:https://www.youtube.com/channel/UCKe6sVrGpWPqSmLwb-lA1cQ

LinkedIn https://www.linkedin.com/.../masterline-lubricants...

Google Business https://g.page/r/CWGLkP-u3_tiEA0

प्रत्